# कॅन्सर तज्ञ डॉ.तुषार मुळे यांचे निरामय सुपरस्पेशालीटी क्लिनिक औरंगाबाद,

## (स्तुती करावी नारायणाची । व्यर्थ न नर नारीची ।)

**"स्तुती करावी नारायणाची, व्यर्थ न नर नारीची"** या म्हणी प्रमाणे जरी सत्य असले तरीही काही व्यक्तीच्या अंगी असलेला सेवाभाव, वागणूक, कार्यपध्दती, समजुन - उमजुन घेण्याची पध्दती व समजावून सांगण्याची व प्रेरणा (Motivates) देण्याची क्षमता व समयसुचकतेनुसार निर्णय घेऊन संबधीतास संपुर्ण सहकार्य करण्याची भावना या व अशा संपुर्ण गुणाणी ओत-प्रोत भरलेले व्यक्तीमत्व हे त्या स्तुतीस पात्रच असते आणि त्यापैकीच हे सत्य वचन डॉ.तुषार मुळे या व्यक्तीमत्वास तंतोतंत लागु पडते असे मला वाटते.

कॅन्सर हा आजारच अशाप्रकारचा आहे की, रूग्ण हा मानसिक व शारिरीक दृष्टीने खचुन जातो तसेच स्वभाव चिडचिडा बणुन जगण्याची उमेद कमी होऊ लागते. त्यासोबतच त्या रूग्णाच्या कुटुंबातील सर्व व्यक्ती (संपुर्ण कुटुंब) व कुटुंबकर्ता सुध्दा सर्वच बाबींनी खचुन जातो. अशा वेळी डॉक्टर या नात्याने त्या रूग्णास व कुटुंबास परत उभारी देण्याचे काम करणारा **'देवदुत'** म्हणून **डॉ.तुषार मुळे** यांच्याकडे पाहीले तर काही वावगे ठरणार नाही. उपरोक्त सर्व गुणसंपन्न असलेले डॉ.तुषार मुळे यांच्याकडे असलेला सेवाभाव व रूग्ण सुश्रुषा व जबाबदारीची जाणीव ठेवून रूग्णाची घेतलेली काळजी ही वाखनन्या सारखी आहे.

माझी पत्नी सौ.विजया कल्याणकर हीस कॅन्सरचा आजार झाला. एशियन हॉस्पिटल, हैद्राबाद व औरंगबाद मधिल विविध हॉस्पिटल मध्ये १२ केमोथेरपी घेतले परंतु दुर्देवाने आजार कमी होत नव्हता. माझे नातेवाईक **डॉ.विवेक देशमुख (Artho Specielist)** यांनी **डॉ.तुषार मुळे** यांचे कडे पुढील उपचार करण्यासंबधाने मार्गदर्शन करून ज्यांनी यापुर्वी व त्यांनी त्याच्यांशी प्रत्यक्ष संभाषण करून पाठविले व सदर रूग्णास यापुढे आता कोणताही उपचार नाही असे सांगितले असतांना सुध्दा त्यांच्या **डॉ.मुळे** यांच्या बौध्दिक कुशलतेने रेडीयेशन थेरपीसारखा व इतर उपचार चालु केला आणि तो सुध्दा अगदी नगण्य खर्चाने. सद्द परीस्थितीत उपचार चालू असून उपचार समाधानकारक आहे. या ठिकाणी केवळ व्यावसाईक तत्वावर उपचार

नसुन रूग्णासोबत आगळी - वेगळी बांधीलकी समजुन उपचार केला जातो हे रूग्णाचा नातेवाईक या नात्याने प्रकर्षाने जानवले म्हणूनच लेखणीतून शब्द बाहेर पडले. वास्तविक ही स्तुती नव्हे तर प्रत्यक्षात घेतलेला अनुभव कथन करण्याचा सार्थ आणि समर्थ प्रयत्न आहे.

याशिवाय रूग्णाप्रती, त्यांचा सहकारी स्टाफ सुध्दा त्याच तोडीने सेवाभाव व कर्तव्यदक्षता वापरून तत्परतेने सेवा प्रदान करतो. **"म्हणतात ना । घरातील मुले चांगली वागली तर त्याच श्रेय त्या घरातील कुटुंब प्रमुखाला जाते व ती जर अयोग्य वागली तर त्याचा संपुर्ण दोष त्या घराण्याला जातो"** परंतु या ठीकाणी मात्र डॉक्टरांचे सर्व सहकारी ज्यामध्ये ब्रदर **(Brother), म्हणून श्री.चंद्रकांत काकडे व सिस्टर (Sister) म्हणून कविता पठाडे व श्वेता देशमुख** हा सर्व स्टाफ रूग्णाप्रती **Brother & Sister** च्या रूपाने सेवाभाव व आस्थेवाईकपणे सेवा करून आपले कार्य चोख व सक्षमपणे पार पाडतात. हे सुध्दा प्रकर्षाने जानवले. त्यांची सेवा सुध्दा वाखनन्याजोगी आहे. यामध्ये दुसरे काही नाही प्रत्यक्ष आलेला अनुभव कथन केला ज्याचा फायदा ईतर रूग्णास सुध्दा होईल.

**।। सर्वांना सन्मानाचा सलाम ।।**

**राजेश्वर भि. कल्याणकर**

(ex. CEO)
The A.D.C.C. Bank Ltd, Aurangabad
Mob.: 9021155999 / 9421756622

